

राशोलमध्ये बेकायदेशीर जहाज पार्किंगविरोधात ग्रामपंचायतीची तक्रार पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



भारतीय खेळाडूंची ३ रौप्य, १ कांस्य पदकांची कमाई पान ४ वर

वेर्णा, गुरुवार, २९ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 266 | Verna, | facebook.com/dainikherald | Thursday 29 May 2025 | Pages 4 | ₹ 4

# मंत्री गावडेंची सारवासारव

## मुख्यमंत्र्यांची घेतली भेट | मी काहीही वावगे बोललो नाही : गावडे

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २८ : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याविषयी मी काहीही वावगे बोललेले नाही. ते माझे चांगले मित्र आहेत. काही लोकांना मात्र माझ्याबद्दल ॲलर्जी आहे, अशी प्रतिक्रिया कला, संस्कृती व क्रीडा मंत्री गोविंद गावडे यांनी बुधवारी माध्यमांशी बोलताना दिली. प्रेरणा दिन कार्यक्रमातील वादग्रस्त विधानावरून उद्भवलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे स्पष्टीकरण दिले.**



गावडे यांनी उटीहून गोव्यात परतल्यानंतर मुख्यमंत्री सावंत यांची भेट घेतली. या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना गावडे म्हणाले, २५ मे रोजी प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात मी काय बोललो, हे सर्वांना ठाऊक आहे. काही जणांनी मुद्दाम अर्थाचा अनर्थ करून माझ्या विधानाचा विपर्यास केला. मी मुख्यमंत्री किंवा त्यांच्या अधिपत्याखालील आदिवासी कल्याण खात्यावर कोणताही थेट आरोप केलेला नाही. मुख्यमंत्री माझे पाच वर्षांचे सहकारी असून मित्र आहेत.

त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्र्यांना भेटून माझे मत स्पष्ट केले. आदिवासी भवन तसेच आदिवासी कल्याण खात्याच्या कार्यपद्धतीत सुधारणा कशी करावी, यावर चर्चा केली. माझ्यावर येणाऱ्या बातम्यांनंतर त्यांची भेट घेणे आवश्यक वाटले.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी गावडे यांच्या विधानाला 'बेजबाबदारपणा' म्हणून नोंदवले होते. याबाबत विचारले असता गावडे म्हणाले, मुख्यमंत्री असे का बोलले, हे मला माहिती नाही. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी गावडे यांनी भेट घेतल्याचे कबूल केले, मात्र या संदर्भात अधिक भाष्य करण्याचे टाळले.

भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक गुरुवारी गोव्यात दाखल होणार आहेत. त्यांच्या आगमनानंतर मुख्यमंत्री व भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक होणार असून गावडे यांच्या विधानाची सविस्तर माहिती घेऊन योग्य ती कारवाई ठरवली जाईल, अशी माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात आदिवासी कल्याण खात्याविषयी वादग्रस्त विधाने केल्यामुळे गावडे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. हे खाते थेट मुख्यमंत्री सावंत यांच्या अखत्यारीत असल्यामुळे गावडे यांचे आरोप अप्रत्यक्षपणे मुख्यमंत्र्यांवरच असल्याचे चित्र निर्माण झाले. त्यामुळे पक्षसंघटनेकडूनही गावडे यांच्यावर कारवाईसाठी दबाव वाढला आहे.

दरम्यान, भाजपमधील काही गट मंत्रिमंडळ फेरबदलाची शक्यता व्यक्त करत आहेत. मात्र, ही कारवाई केवळ गावडे यांच्यापुरती मर्यादित ठेवावी, असा विचार मुख्यमंत्री सावंत यांचे निकटवर्तीय करत असल्याचे समजते.भाजप प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांनी यापूर्वीच गावडे यांना इशारा देत सांगितले होते, उचलली जीभ लावली टाळ्याला, असे चालणार नाही. कारवाई तर होणारच. राजकीय वर्तुळात या घडामोडींमुळे उत्सुकता शिगेला पोहोचली असून, मंत्री गावडे यांच्यावर पक्षशिस्तीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# खरगे यांची गोव्यातील पहिली जाहीर सभा रद्द

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८** : अखिल भारतीय काँग्रेस समितीचे (एआयसीसी) अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची गोवा स्थापना दिनानिमित्त (३० मे) नावेली येथे नियोजित जाहीर सभा अखेर रद्द करण्यात आली आहे. हवामानाच्या प्रतिकूल स्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे काँग्रेसने जाहीर केले असले तरी, प्रत्यक्षात सभा आयोजित करताना पुरेशी गर्दी जमवण्यात अपयश आल्याचे पक्षाच्या आतील सूत्रांकडून समजते.

मंगळवारी एआयसीसीचे गोवा डेस्क प्रभारी माणिकराव ठाकरे यांनी काही प्रमुख काँग्रेस नेत्यांसोबत बैठक घेऊन तयारीचा आढावा घेतला. मात्र, १,५०० क्षमतेच्या मनोहर पर्रिकर इनडोअर स्टेडियममध्ये अपेक्षित गर्दी जमवता येईल का, याबाबत ठोस आश्वासन मिळू शकले नाही. यानंतर बुधवारी सकाळी ठाकरे गोव्यातून निघून गेले, अशी माहिती सूत्रांनी दिली.

गोवा प्रदेश काँग्रेस कमिटीचे (जीपीसीसी) वरिष्ठ उपाध्यक्ष एम. के. शेख यांनी बैठकीच्या रद्द होण्याची अधिकृत माहिती दिली. त्यांनी सांगितले, खरगे यांच्या गोव्यातील पहिल्या भेटीच्या अनुषंगाने आम्ही तयारी करत होतो. माणिकराव ठाकरे यांनीही

### ▶ काँग्रेसला संघटनात्मक अपयशाचा फटका?

तयारीबाबत आढावा घेतला. मात्र, पावसाळ्याचा संभाव्य फटका लक्षात घेता सभा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर नव्याने तारखेचा निर्णय घेतला जाईल. दरम्यान, काँग्रेसचेच उपाध्यक्ष सुनील कवठणकर यांनीदेखील सभा रद्द झाल्याचे मान्य केले. मात्र, त्यामागील नेमके कारण त्यांना माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले.

दक्षिण गोव्यातील काँग्रेसमधील एका वरिष्ठ कार्यकर्त्याने नाव न सांगण्याच्या अटीवर भाष्य करताना सांगितले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. दोन दिवसांपूर्वीच काँग्रेसचे राज्याध्यक्ष अमित पाटकर आणि विरोधी पक्षनेते युरी आलेमाव यांनी खरगे यांची भेट घेऊन त्यांना या सभेसाठी आमंत्रण दिले होते. त्यांना पावसाची शक्यता माहित नव्हती का? की नावेलीमधील स्टेडियममधून पावसाचे पाणी गळते याची कल्पना नव्हती? तरीही त्यांनी सभा आयोजित केली. ही योजना अपयशी ठरली हे स्पष्ट आहे.

दरम्यान, माजी मंत्री आणि गोवा फॉरवर्डचे अध्यक्ष विजय सरदेसाई यांनी यावर प्रतिक्रिया देताना म्हटले, हा काँग्रेस पक्षाचा पान २ ▶

## निवडक

### देशातील ४ राज्यात पुन्हा 'मॉक ड्रिल'

**नवी दिल्ली, दि. २८** : भारतातील ४ राज्यांमध्ये उद्या मॉकड्रिल होणार आहे. गुजरात, राजस्थान, पंजाब आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये मॉक ड्रिल आयोजित केले जातील. पाकिस्तानच्या सीमेला लागून असणाऱ्या राज्यांमध्ये हे मॉक ड्रिल आयोजित केले जातील. भारताने पाकिस्तानविरुद्ध 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केल्यानंतर काही आठवड्यांनंतर हे मॉक ड्रिल केलं जात आहे. यादरम्यान लोकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

केंद्र सरकारने जम्मू काश्मीर, पंजाब, राजस्थान आणि गुजरातमध्ये मॉक ड्रिल करण्याचा आदेश दिला आहे. या चारही राज्यांच्या सीमा पाकिस्तानला लागून आहेत. भारत आणि पाकिस्तानदरम्यान ३३०० किमी लांब सीमा आहे. जम्मू काश्मीरला लागून असणाऱ्या सीमेला डेउ म्हणजेच नियंत्रण रेषा म्हटले जाते. तर पंजाब, राजस्थान आणि गुजरातला लागून असलेल्या सीमेला आंतरराष्ट्रीय सीमा म्हटले जाते.

याआधीही केंद्र सरकारने पाकिस्तानसोबत असणाऱ्या तणावाच्या पार्श्वभूमीवर ७ मे रोजी देशातील २४४ जिल्ह्यांमध्ये मॉक ड्रिलची घोषणा केली होती. पण ६-७ मेच्या रात्री भारताने पाकिस्तानच्या दहशतवादी तळांविरोधात कारवाई केली. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारताने पाकिस्तानच्या ९ दहशतवादी तळांवर हल्ला केला.

---

### मुंबईत जोरदार पाऊस

**मुंबई, दि. २८** : देशातील १७ राज्यांमध्ये मान्सून दाखल झाला आहे. बुधवारी मान्सून वेळेच्या १२ दिवस आधी छत्तीसगडमध्ये आणि ओडिशात १३ दिवस आधी पोहोचला. दोन्ही राज्यांच्या काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला.

महाराष्ट्रातील मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड येथे आज मुसळधार पाऊस पडत आहे. येथे पावसासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. बदलापूर, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली आणि ठाणे या वेगवेगळ्या भागात पाणी साचले आहे.

राजस्थानमध्ये तीन प्रकारचे हवामान दिसून येत आहे. बुंदी जिल्ह्यात तीव्र उष्णता आहे. येथील एका गावात एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. तपासात उष्णतेच्या लाटेमुळे हा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. उदयपूर, चित्तोडगड-भिलवाडा येथे पाऊस सुरू आहे. जैसलमेरमध्ये सकाळपासून धुळीचे वादळ आहे.

मंगळवार मध्य प्रदेशातील १५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये पाऊस पडला. आजही भोपाळ, इंदूर-उज्जैनसह ४० जिल्ह्यांमध्ये जोरदार वादळासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. काही जिल्ह्यांमध्ये वादळाचा वेग ताशी ५० किमी पर्यंत असू शकतो. आज बिहारमधील १२ जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

---

### गाझा चेंगराचेंगरीत; ३ जणांचा मृत्यू

**राफा, दि. २८** : मंगळवारी गाझा येथील राफा येथे अन्न गोळा करण्यासाठी आलेल्या लोकांमध्ये चेंगराचेंगरी होऊन तीन जणांचा मृत्यू झाला. याशिवाय ४६ जण जखमी झाले आहेत आणि ७ जण बेपत्ता आहेत. अल जझारीच्या वृत्तानुसार, इस्त्रायली सैनिकांनी हवेत गोळीबार केल्यानंतर चेंगराचेंगरी झाली. इस्त्रायली सैन्याने सांगितले की त्यांच्या सैन्याने वितरण स्थळाबाहेरील भागात चेतावणी गोळीबार केला होता.राफामधील अमेरिकेच्या निधीतून चालणाऱ्या मदत केंद्रात हजारो पॅलेस्टिनी लोक जेवण्यासाठी गर्दी करतात. गाझाच्या राज्य माध्यम कार्यालयाने एका निवेदनात म्हटले आहे. सध्या गाझाला एका आठवड्यासाठी मदत पुरवली जाईल. या काळात, इस्त्रायल गाझामध्ये अन्न वाटप करण्यासाठी नवीन वितरण केंद्रे बांधेल. ही केंद्रे इस्त्रायली सैन्याच्या देखरेखीखाली असतील. ते अमेरिकन कंपन्यांद्वारे चालवले जाईल.

# घर क्रमांक विभाजन प्रक्रिया सुलभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८ :** ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील निवासी घरांना स्वतंत्र घर क्रमांक देण्यासाठीची प्रक्रिया आता अधिक सुलभ होणार आहे. पंचायत संचालनालयाने यासंदर्भात बुधवार, २८ मे रोजी एक परिपत्रक जारी केले असून, ही सुधारित प्रक्रिया येत्या सोमवार, २ जूनपासून लागू करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत याची माहिती दिली. त्यांनी स्पष्ट केले की, घर क्रमांकाचे विभाजन ही प्रक्रिया केवळ आर्थिक स्वरूपाची असून त्यातून कोणताही मालमत्तेवरील हक्क मिळत नाही. याचा उद्देश केवळ कर आकारणीसाठी निवासी घराच्या भागांना वेगळी ओळख देणे हा आहे. ज्या अर्जदारांनी नवीन गृहनिर्माण भागासाठी पाणी व वीज जोडणीसाठी अनिवार्य एनओसी घेतली आहे, अशा अर्जांवर ग्रामपंचायती १५



**२ जूनपासून नवीन नियम अंमलात**

दिवसांच्या आत निर्णय घेतील, असेही या परिपत्रकात नमूद आहे.

मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्जदाराने 'फॉर्म अ' भरून ग्रामपंचायतीकडे अर्ज करावा लागेल. अर्जासोबत विद्यमान घर क्रमांकाची घरकर पावती, मूळ कर निर्धारणकर्त्याचे मृत्यू प्रमाणपत्र (असल्यास), अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्र किंवा संबंधितता दर्शवणारे दस्तऐवज (उदा. बँक पासबुक, रेशन कार्ड), फॉर्म १ व १४, संबंधित भागाचा आराखडा इत्यादी कागदपत्रे सादर करावी लागतील.

विभाजित घर क्रमांक देण्यापूर्वी ग्रामपंचायत संबंधित घराची प्रत्यक्ष पाहणी करून अर्जातील माहितीची पडताळणी करेल. नवीन क्रमांक मूळ घर क्रमांकास १ अ , ब अशा प्रत्ययासह जोडले जातील. हा क्रमांक केवळ त्याच घरातील स्वतंत्र स्वयंपाकघर व्यवस्था असलेल्या भागांना दिला जाईल.

मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, नवीन विभाजित घर क्रमांकांवर स्वतंत्र घरकर व कचरा कर आकारला जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल. तसेच, नगरविकास संचालनालय महानगरपालिका क्षेत्रांतील निवासी घरे देखील या प्रक्रियेच्या कक्षेत आणण्यासाठी लवकरच स्वतंत्र परिपत्रक जारी करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीतील कचरा प्रश्न पेटला

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २८** : कुंकळ्ळी औद्योगिक वसाहतीत सध्या सुरू असलेल्या धोकादायक कचऱ्याच्या झाकण्याच्या प्रक्रियेविरोधात स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, त्यांनी कचरा संपूर्णपणे काढून टाकण्याची आणि पर्यावरणपूरक उपाययोजना राबवण्याची जोरदार मागणी केली आहे.



औद्योगिक वसाहतीतील कचरा झाकण्याच्या सध्या सुरू असलेल्या कारवाईला नागरिकांनी तात्पुरता उपाय मानले असून, हे दीर्घकालीन समाधान नसल्याचे स्पष्ट केले आहे. नागरिकांनी कचरा जाळण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा उल्लेख करत, त्याचे दुष्परिणाम शेजारील शेती, पाणीस्त्रोत आणि आरोग्यावर होत असल्याची तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

हा आता केवळ औद्योगिक कचरा राहिलेला नाही, तो खाणखड्ड्यासारखा बनला आहे, ज्यामधून विषारी घटक आमच्या शेतीच्या जमिनीत झिरपत आहेत, असे स्थानिक रहिवासी अविराज देसाई यांनी सांगितले.

पावसाळ्यात या कचराकुंडीतून पाणी साचून आसपासच्या सखल भागात प्रदूषित पाण्याचा फैलाव होत असल्यामुळे आरोग्य आणि पर्यावरणासाठी धोका अधिक वाढल्याची नागरिकांची तक्रार आहे. नागरिकांनी या संपूर्ण कचरा साठ्याचे स्थलांतर करून, नियमबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने त्याची विल्हेवाट लावण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उद्योग विभागाच्या तात्काळ हस्तक्षेपाची आवश्यकता असल्याचे अधोरेखित केले.

फक्त झाकून टाकणे म्हणजे समस्येवर पांघरुण घालणे. ही गोष्ट आपल्या मातीची, आपल्या पिकांची आणि आपल्या मुलांच्या आरोग्याची आहे, असे देसाई यांनी स्पष्टपणे नमूद केले.

स्थानिकांनी असेही निदर्शनास आणून दिले की सध्या सुरू असलेली कारवाई पर्यावरणीय नियमांचे पालन करत नाही आणि मूळ समस्येवर म्हणजेच बेकायदेशीरपणे टाकल्या जाणाऱ्या औद्योगिक कचऱ्यावर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही.

पर्यावरण तज्ज्ञांनीही इशारा दिला आहे की लीचेट (कचरामधून वाहणारे विषारी द्रव) रोखण्यासाठी योग्य उपाययोजना न झाल्यास आणि कचऱ्याचे संपूर्णपणे व्यवस्थापन न झाल्यास, हा धोका भविष्यात अधिक गहिरा होऊ शकतो. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे कठोर अंमलबजावणीसह दीर्घकालीन शाश्वत उपाय राबवण्याची मागणी करत, या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष करू नका असे आवाहन केले आहे.

# डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाचे कठोर पाऊल

## विद्यार्थी व्हिसावर नवीन मर्यादा | भारतीय विद्यार्थ्यांना बसणार फटका : सोशल मीडियावर नजर

**वॉशिंग्टन, दि. २८ :**

अमेरिकेत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या भारतासह अनेक आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी ट्रम्प प्रशासनाकडून आणखी एक झटका देणारा निर्णय समोर आला आहे. विद्यार्थी व्हिसा प्रक्रियेत आता सोशल मीडियाच्या तपासणीचा भाग अधिक तीव्र करण्यात येणार आहे.

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, विद्यार्थी व्हिसासाठी अर्ज करणाऱ्यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सची सखोल तपासणी केली जाईल. याअंतर्गत, फेसबुक, एक्स (पूर्वीचे ट्विटर), लिंक्डइन, इंस्टाग्राम आणि टिकटॉक यासारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील क्रियाकलापांचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा थेट परिणाम अमेरिकेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या भारतीय आणि इतर देशांतील विद्यार्थ्यांवर




होण्याची शक्यता आहे. अमेरिकेतील विद्यापीठांचे नवीन शैक्षणिक सत्र ऑगस्टपासून सुरू होणार असताना, व्हिसासाठी अपॉइंटमेंट मिळवणं आता आणखी कठीण होणार आहे.

'ओपन डोअर्स २०२४' या अहवालानुसार, सध्या अमेरिकेत सुमारे ३.३० लाख भारतीय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, सोशल मीडिया तपासणी आणि व्हिसा नियमांतील कडक अटींमुळे भविष्यात भारतातील अनेक विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

सीबीएस न्यूजने पाहिलेल्या अमेरिकी परराष्ट्र विभागाच्या एका अंतर्गत मेमोमध्ये म्हटले आहे की, जगभरातील अमेरिकी दूतावासांनी आपल्या कॅलेंडरमधून विद्यार्थी व्हिसासाठीच्या सर्व रिकाम्या अपॉइंटमेंट्स रद्द कराव्यात. मात्र, आधीच अपॉइंटमेंट मिळवलेल्या अर्जदारांवर या निर्णयाचा तातडीचा परिणाम होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ट्रम्प प्रशासन आणि अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये सुरू असलेल्या वादामुळेही विद्यार्थ्यांवर दडपण वाढले आहे. पॅलेस्टिनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ निदर्शने करणाऱ्या आणि त्याबाबत सोशल मीडियावर व्यक्त झालेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे व्हिसा याआधीच रद्द करण्यात आले आहेत. प्रशासनाचे म्हणणे आहे की, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व्हिसा दिला जातो, परंतु राजकीय चळवळीसाठी नाही. याच पार्श्वभूमीवर सोशल मीडियावरील आक्षेपार्ह किंवा राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या' पोस्ट्स व्हिसा प्रक्रियेस अडथळा ठरू शकतात, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

विद्यापीठांमध्ये व्यक्त होणाऱ्या राजकीय भूमिकांवरही ट्रम्प प्रशासनाने आक्षेप घेतला आहे. काही विद्यापीठांवर यहूदीविरोधी भावना पसरवण्यास प्रोत्साहन दिल्याचा' आरोप करत व्हाईट हाऊसने त्यांचा सरकारी निधी थांबवला आहे. यासोबतच हजारो विद्यार्थ्यांचे व्हिसा रद्द करण्यात आले असून, काही प्रकरणांत न्यायालयांनी या कारवाईला स्थगितीही दिली आहे.

ट्रम्प प्रशासन आणि विद्यापीठे यांच्यात सुरू असलेला वाद सध्या निवळण्याची चिन्हे दिसत नाहीत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांसाठी अमेरिकेत प्रवेश घेणे अधिकच जिकिरीचे बनत आहे. विद्यार्थ्यांनी आता सोशल मीडियावरील पोस्ट करताना विशेष काळजी घ्यावी, अन्यथा त्यांच्या शैक्षणिक भविष्यावर परिणाम होऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.